प्रेसनोट दिनांक १३/०३/२०१९

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक – २०१९ च्या निवडणूकीचा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने दिनांक १०/०३/२०१९ च्या प्रसिद्धी पत्रकान्वये घोषित केला आहे. महाराष्ट्रातील निवडणूका या ११ एप्रिल ते २९ एप्रिल २०१९ या कालावधीमध्ये चार टप्प्यांमध्ये होणार असून पुणे जिल्हयातील पुणे व बारामती मतदारसंघाच्या निवडणूका हया तिसऱ्या टप्प्यात दिनांक २३/०४/२०१९ रोजी व शिरुर मतदारसंघाची निवडणूक ही चौथ्या टप्प्यात दिनांक २९/०४/२०१९ रोजी होणार आहे.

आगामी सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दिनांक १०/०३/२०१९ रोजी पासून भारत निवडणूक आयोगाकडून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. पुणे पोलीस आणि पुणे शहर/जिल्हयातील विविध राजकीय पक्षांचे प्रमुख प्रतिनिधी यांच्या समन्वयातून पुणे पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण न होता पुणे जिल्हयातील सार्वत्रिक लोकसभा निवडणूक - २०१९ ही सुरळीतपणे, शांततेत व भयमुक्त वातारणात पार पडाव्यात या उद्देशाने पुणे पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम् यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १३/०३/२०१९ रोजी समन्वय बैठकीचे आयोजन कॉन्फरन्स हॉल, पुणे पोलीस आयुक्त कार्यालय येथे करण्यात आले होते.

सदर बैठकीसाठी सह पोलीस आयुक्त श्री. शिवाजीराव बोडखे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री. प्रदीप देशपांडे, पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा श्री. मितेश घट्टे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय श्रीमती स्वप्ना गोरे व इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते. तसेच श्री. अजित दरेकर, श्री रणजित गायकवाड, सौ. मिराताई शिंदे, सौ. छाया जाधव (कॉंग्रेस आय), श्री. अजित अभ्यंकर (कम्युनिस्ट पार्टी), ॲड. श्री. योगेश पांडे (स्वाभिमानी पक्ष), श्री. बाळासाहेब आवारे, श्री. सुधाकर फुले (बहुजन समाज पक्ष) श्री. भोलासिंग अरोरा, ॲड. श्री. समीर शेख, श्री. संतोष नांगरे (राष्ट्रवादी कॉंग्रेस), श्री.कुशल शिंदे, श्री अजय शिंदे, श्री. बाळा शेडगे (मनसे), श्री. सुमित व्होरा (आप), श्री. चंद्रकांत मोकाटे, श्री. प्रशांत बधे, श्री. प्रशांत मते (शिवसेना) श्री. योगेश गोगावले (भाजपा) व इतर असे विविध राजकीय पक्षांचे ४० ते ५० लोकप्रतिनिधी व कार्यकर्ते हजर होते.

सदर बैठकी दरम्यान पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा श्री. मितेश घट्टे यांनी उपस्थित प्रतिनिधी व कार्यकर्त्यांचे स्वागत केले. तद्नंतर मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी आदर्श आचारसंहितेबाबत मार्गदर्शन केले. उपस्थित प्रतिनिधींनी आचार संहिते दरम्यान - प्रचार सभेसाठी जागेची उपलब्धता, येणारे सण, महोत्सव, महापुरुषांची जयंती साजरी करताना, प्रचाराकरीता येणाऱ्या अति महत्त्वाच्या व्यक्ती, स्टार प्रचारक यांची सुरक्षा व्यवस्था, जाहिर सभा व इतर कार्यक्रम या दरम्यान पोलीस व राजकीय पक्ष यांच्यामध्ये परस्पर सहकार्याची अपेक्षा व्यक्त करुन आचारसंहितेच्या कालावधीत पसरणाऱ्या खोटया बातम्या, अफवांवर सायबर सेलद्वारे नियंत्रण, निवडणूक कालावधीत दाखल होणारे गुन्हे, पोलिसांचे मतदानाचे कमी प्रमाण, पैसे व दारु वाटपावरील निर्बंध, एक खिडकी योजना, स्थानिक पातळीवर परवानगी देणे, cVIGIL APP इत्यादी विषयांवर चर्चा करण्यात आली. निवडणूक कालावधीमध्ये पोलिसांकडून भरारी पथके तसेच चेकपोस्ट ठिकाणी सर्व्हेलन्स पथके असा बंदोबस्त नेमण्यात येणार असून निवडणूक प्रक्रियेदरम्यान मतदारांना निर्भय व सुरक्षित वातावरण उपलब्ध करुन देणेसाठी पुणे पोलीस कटिबद्ध असल्याचे पुणे पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम् यांनी सांगितले.

सदर समन्वय बैठकी दरम्यान मा. पोलीस आयुक्त व उपस्थित इतर वरिष्ठ अधिकारी यांनी प्रतिनिधींच्या शंकांचे निरसन केले. तसेच संपूर्ण निवडणूक प्रक्रियेदरम्यान पुणे पोलिसांकडून कायदेशीर सहकार्य करण्यात येईल याबाबत आश्वासन देऊन सर्व राजकीय पक्षांनी सहकार्य करावे, तसेच संपूर्ण निवडणूक कालावधी दरम्यान सर्व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करावे व आपल्या पक्षांचे कार्यकर्ते यांना सदरबाबत मार्गदर्शन करुन त्यांचेकडूनही आदर्श आचारसंहितेचे पालन होईल याची दक्षता घ्यावी याबाबत आवाहन करण्यात आले.



**(मितेश घट्टे)**
पोलीस उप आयुक्त
विशेष शाखा, पुणे शहर